
दैनिक
अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
# रायगड नगरी
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित
• वर्ष १७ वे • अंक २७६ • MAHMAR/2006/17212 • रायगड • गुरुवार दि.५ जानेवारी २०२३ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# वीज कर्मचाऱ्यांचा संप मागे

## वीज कर्मचाऱ्यांच्या मागण्यांचा सकारात्मक विचार करू : उपमुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**संपकरी वीज कर्मचाऱ्यांशी उपमुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री देवेंद्र फडणवीस यांची चर्चा झाल्यानंतर राज्य शासन मागण्यांसंदर्भात सकारात्मक विचार करणार असल्याने संपकरी वीज कर्मचाऱ्यांनी पुकारलेला संप मागे घेत असल्याचे घोषित केले.**



सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे ऊर्जा विभागातील संपकरी कर्मचाऱ्यांच्या प्रतिनिधींशी उपमुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चर्चा केली. यावेळी आमदार भाई जगताप, ऊर्जा विभागाच्या प्रधान सचिव आभा शुक्ला, 'महावितरण'चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, 'महानिर्मिती'चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक पी अन्बलगन तसेच ऊर्जा विभागाचे वरिष्ठ अधिकारी तसेच विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री फडणवीस म्हणाले, वीज कर्मचाऱ्यांच्या रास्त मागण्यांचा शासन सकारात्मकपणे विचार करत असून वीज कंपन्यांच्या खासगीकरणाचा कोणताही विचार नाही.

सर्व कायदेशीर आयुधे वापरून पॅरलल लायसन्ससंदर्भात महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग मध्ये आक्षेप मांडण्यात येईल. कंपनीवर होणारा परिणाम व ग्राहकांचे हित यावेळी प्राधान्याने मांडण्यात येईल, असे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, वीज कंपन्या अधिक बळकट करण्यावर भर देण्यात येत असून आर्थिक बळकटीकरणासाठीही ठोस उपाययोजना करण्यात येत आहेत. यासाठी कंपनीच्या कर्मचाऱ्यांनीही काही नावीन्यपूर्ण कल्पना मांडाव्यात त्यांचे नक्कीच स्वागत करण्यात येईल. फ्रॅन्चायजी कुठे करायच्या याचा विचार होणे गरजेचे असते. फ्रॅन्चायजीचा उपयोग झाला पाहिजे. त्याद्वारे काही नवीन पायाभूत सुविधा उभ्या राहिल्या पाहिजेत, असेही फडणवीस यांनी सांगितले.

### कंत्राटी कर्मचाऱ्यांना दिलासा देणार

कंत्राटी कर्मचाऱ्यांना दिलासा देण्यासाठी पावले उचलण्यात येत आहेत. त्यांचे मानधन थेट त्यांच्या खात्यात जमा करण्यासाठी यंत्रणा कार्यान्वित करण्यात येईल. त्यांची सामाजिक सुरक्षितता जपण्यावर विशेष भर देण्यात येणार असल्याचेही फडणवीस यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, जास्तीची गुंतवणूक होऊन नव्याने पायाभूत सुविधा उभ्या राहिल्या पाहिजेत यावर भर देण्यात येत आहे. जलविद्युत प्रकल्पांसंदर्भातही निर्णय घेण्यात येणार असल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

# अनिल परब यांची १० कोटींची मालमत्ता ईडीकडून जप्त

**दै.रायगड नगरी । मुंबई**

ठाकरे गटाचे आमदार अनिल परब यांना सक्तवसुली संचालनालयानं (ईडी) दणका दिला आहे. ईडीकडून अनिल परब यांच्याशी निगडीत १० कोटींची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. रत्नागिरीतील साई रिसॉर्ट प्रकरणी ईडीने मनी लॉन्ड्रिंगचा गुन्हा दाखल केला होता. याप्रकरणी अनिल परब यांची ईडीकडून चौकशी देखील झाली होती. त्यानंतर आज ईडीकडून जप्तीची कारवाई करण्यात आली आहे.



ईडीनं या कारवाई संदर्भात एक ट्विट देखील केलं आहे. यात अनिल परब, साई रिसॉर्ट एनएक्स आणि इतर ठिकाणची १०.२० कोटी रुपयांची मालमत्ता मनी लॉन्ड्रिंग प्रकरणी जप्त करण्यात आली आहे, अशी माहिती देण्यात आली आहे. अनिल परब यांनी मात्र या कारवाईविरोधात कोर्टात जाण्याचं भाष्य केलं आहे. या प्रकरणाशी आपला काहीही संबंध नसून कारवाई झाली असेल तर याबाबत मी कोर्टात दाद मागणार आहे, असं अनिल परब यांनी म्हटलं आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जप्त करण्यात आलेल्या मालमत्तेत रत्नागिरीतील ४२ गुंठे जमीन आणि तेथे बांधण्यात आलेल्या साई रिसॉर्टचा समावेश आहे. पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाच्या तक्रारीच्या आधारे ईडीने ही कारवाई केली आहे.

# २४ तासांचा आत खुन्याला ठोकल्या बेड्या

**दै.रायगड नगरी । उरण**

येथील बोकडविरा गावातील वृध्द महिला ललिताबाई ठाकूर हिचा खून करुन फरार झालेला आरोपी अमोल सर्जेराव शेलार याला नगर येथून अटक करण्यास उरण पोलीस ठाण्याला यश आले आहे. उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील पाटील यांच्या नेतृत्वाखाली उरण पोलीसांनी अवघ्या २४ तासांच्या आत तपास लावून खुन्याला बेड्या ठोकल्याने सर्व स्तरातून पोलीसांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

पोलीस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार बोकडविरा गावातील ललिताबाई ठाकूर या महिलेने आपल्या उदरनिर्वाहासाठी शेजारचीच खोली अमोल सर्जेराव शेलार या इसमाला भाड्याने दिली होती. त्याच खोलीला बाहेरून कुलूप लावलेल्या अवस्थेत बुधवारी ( दि३) ललिताबाई ठाकूर यांचा मृत्यू अवस्थेत देह आढळून आला होता. अमोल सर्जेराव शेलार हा भाडोत्री इसम घटने पासूनच फरार झाला असल्याचे पोलीस तपासात समोर आले.

ललिताबाई ठाकूर यांच्याशी भाडोत्र्याबरोबर भांडण झाले होते. या वादातूनच खून झाला असल्याचा संशय व्यक्त केला जात असल्याचे तपासात समोर आले. दरम्यान उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील पाटील यांनी घटनास्थळी फॉरेन्सिक लॅब, फिंगरप्रिंट, श्वान पथक दाखल करुन खुन्याचा शोध सुरू केला. तसेच संशयित फरार आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलिस पथके तैनात केली असता ललिताबाई ठाकूर हिच्या खूना प्रकरणी अमोल सर्जेराव शेलार या इसमास पोलीस पथकाने मोठ्या शिताफीने नगर येथून अवघ्या २४ तासांच्या आत ताब्यात घेऊन त्याला बेड्या ठोकल्या असून या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत. एकंदरीत उरण पोलिसांनी २४ तासांच्या आत खून प्रकरणी आरोपीला बेड्या ठोकल्याने सर्वस्तरातून वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# पनवेल शहरातील अनेक भागातील वीजपुरवठा पुन्हा सुरळीत

## बाळासाहेबांची शिवसेना उतरली रस्त्यावर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महावितरणच्या कार्यक्षेत्रात अदानी वीज कंपनीला वितरण परवाना देऊ नये, या मागणीसह खासगीकरणाविरोधात शासकीय वीज कंपन्यांतील कर्मचाऱ्यांनी संप पुकारला आहे. या संपामुळे पन–वेल शहरात विद्युत पुरवठा खंडित झाला होता. अशा परिस्थितीत बाळासाहेबांच्या शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी कार्यकारी अभियंता सरोदे यांच्याबरोबर फिरून वीजपुरवठा सुरळीत करण्यास भाग पाडले.

महावितरण मधील कर्मचाऱ्यांनी संप पुकारला आहे. या संपामुळे सामान्य नागरिकांना नाहक मनस्ताप होत आहे. यामुळे पनवेल शहरातील टिळक रोड, महात्मा फुले रोड, पायोनियर विभाग, मिडल क्लास सोसायटी इत्यादी परिसरातील विद्युत पुरवठा खंडित झाला होता. खंडित पुरवठा सुरळीत करण्यासाठी कुठलेही कर्मचारी जागेवर नव्हते अशा परिस्थितीत बाळासाहेबांची शिवसे–नेनेचे महानगर प्रमुख चंद्रशेखर सोमण यांनी कार्यकारी अभियंता सरोदे यांच्याशी पाठपुरावा सुरू केला. त्यानंतर लगेचच सकाळपासून पनवेल महानगरप्रमुख ड. प्रथमेश चंद्रशेखर सोमण यांच्या नेतृत्वात पनवेल मधील शहरप्रमुख प्रसाद सोनावणे, शहर संघटक अभिजीत साखरे, उपशहर प्रमुख अर्जुन परदेशी, विभाग प्रमुख आशिष पनवेलकर इत्यादींनी ज्या भागात लाईट नाहीत त्या भागात कार्यकारी अभियंता सरोदे यांच्याबरोबर फिरून वीजपुरवठा सुरळीत करण्यास भाग पाडले.

कार्यकारी अभियंता असल्याने तांत्रिकदृष्ट्या ते सहभागी नाहीत परंतु उच्चपदस्थ व्यक्ती असूनही निव्वळ एका ड्रायव्हरच्या सहाय्याने पनवेल मधील अनेक भागात स्वतः फिरून त्यांनी वीजपुरवठा सुरळीत केला आहे. त्यावेळेस प्रथमेश सोमण व त्यांचे प्रमुख सहकारी पदाधिकारी देखील फिरून त्यांना सहकार्य केले. पोलीस देखील सतर्क असून प्रमुख सबस्टेशनवर पोलिसांनी बंदोबस्त ठेवला आहे. अजूनही काही भागात हा त्रास असेल परंतु आम्ही शक्य तिथे पाठपुरावा करून वीजपुरवठा सुरळीत करण्याचा प्रयत्न करत आहोत अशी प्रतिक्रिया सोमण यांनी दिली.



# गुरुवारपासून नावडे फेज २ मध्ये 'आमदार चषक'

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नावडे येथील जय हनुमान क्रिकेट क्लबच्या वतीने गुरुवार दिनांक ०५ जानेवारी ते रविवारी ०८ जानेवारीपर्यंत 'आमदार चषक २०२३' टेनिस क्रिकेट सामान्यांचे आयोजन करण्यात आले आहे. या नावडे फेज २ येथील सिडको मैदानावर होणाऱ्या या स्पर्धे चे उदघाटन भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते तर बक्षिस वितरण पनवेल महापालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या हस्ते होणार आहे.

यावेळी भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, शहर अध्यक्ष जयंत पगडे यांच्यासह स्थानिक स्वराज्य संस्थेतील लोकप्रतिनिधी आणि पदाधिकाऱ्यांची उपस्थिती असणार आहे. या स्पर्धेतील विजेत्या संघास ०१ लाख रुपये व आकर्षक चषक, उपविजेत्यास ५० हजार रुपये व चषक, तसेच तृतीय आणि चतुर्थ क्रमांकास प्रत्येकी २५ हजार रुपये व आकर्षक चषक, त्याचबरोबर मालिकावीर, उत्कृष्ठ फलंदाज, गोलंदाज, क्षेत्ररक्षक यांना बक्षिसे देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. या स्पर्धे चा क्रिकेटप्रेमींनी लाभ घ्यावा, असे आवाहन स्पर्धेचे आयोजक प्रशांत खानावकर आणि सहकाऱ्यांनी केले आहे.

# माणगाव महालक्ष्मीमध्ये आढळले रक्तांचे ठिपके

**दै.रायगड नगरी । पद्माकर उभारे**

**माणगाव** : माणगाव शहरातील उतेखोल वाडीत नव्याने निर्माण झालेल्या महालक्ष्मी निवाराया कॉम्प्लेक्स मध्ये ३ जानेवारी रात्री काहीतरी भयानक प्रकार घडला असावा. या कॉम्प्लेक्स च्या इमारत क्रमांक ३ च्या ए विंग आणि बी विंग चे जिने आणि टेरेस वर रक्ताचे शिंतोडे आणि ठिपके ४ जानेवारी रोजी राहणाऱ्या नागरिकांना दिसल्याने उतेखोलवाडी व महालक्ष्मी निवारा परिसरात एकच खळबळ माजली असून महालक्ष्मी निवारा कॉम्प्लेक्स मध्ये राहणाऱ्या नागरिकांचा सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असल्याचे तेथील नागरिकांनी बोलताना सांगितले.

या महालक्ष्मी निवारा च्या सध्या ३ इमारतीमध्ये नागरिक वसाहतीत आहेत. मात्र या रहिवासी लोकांची कोणत्याही प्रकारची गृहनिर्माण संस्था (सोसायटी) अद्याप पर्यंत रजिस्टर झालेली नाही. आणि या बिल्डर कडून कॉम्प्लेक्स परिसरात लावलेले सी सी टीव्ही कॅमेरे निकामी झालेले आहेत. सदर कॅमेरे दुरुस्ती करून घ्यावे अशी मागणी रहिवासी नागरीकांनी बिल्डर आणि व्यवस्थापनाकडे करून देखील दुर्लक्ष केल्याने आज रोजी घडलेल्या प्रकाराचे गूढ उघडण्यास विलंब होते अशी माहिती स्थानिक रहिवाश्यांनी उपस्थित पत्रकारांना दिली. तसेच या कॉम्प्लेक्स चे जबाबदार रहिवासी सलील चव्हाण उपस्थित पत्रकाराना म्हणाले की हा प्रकार कदाचित ३ जानेवारी रात्री ११ च्या दरम्यान घडला असावा..! तर मग सुरक्षारक्षक कुठे होते? ही पण चिंतेची बाब आहे. विशेष म्हणजे इमारत क्रमांक ३ च्या ए विंग आणि बी विंग च्या जिने आणि टेरेस वर आढळलेल्या रक्तांच्या ठिपक्याप्रमाणे असे ठिपके उतेखोल वाडीची एन्ट्री व महाराष्ट्र नवनिर्माण सेना दक्षिण रायगड जिल्हा कार्यालयासमोरील रस्त्या पर्यंत दिसून आले आहे. प्रथमदर्शनी पाहता हे रक्त मानवी असल्याचे दिसून येत आहे. सदर प्रकरणाची दखल घेत माणगाव पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली माणगाव पोलीसांनी घटनास्थळी धाव घेत रक्ताचे नमुने गोळा करून तपासाची सूत्रे हलविली आहेत.






# उपायुक्त कल्पिता पिंपळे यांची मीरा-भाईंदर महानगरपालिकेत बदली



**दै.रायगड नगरी । पनवेल**

उपायुक्त कल्पिता पिंपळे यांची मीरा–भाईंदर महानगरपालिकेत बदली झाली असून, आयुक्त तथा प्रशासक श्री.गणेश देशमुख यांनी आज(४ जानेवारी) महापालिकेच्या मुख्यालयातील बैठकगृहामध्ये झालेल्या कार्यक्रमामध्ये त्यांना पुष्पगुच्छ देऊन भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रशांत रसाळ, उपायुक्त सचिन पवार, उपायुक्त गणेश शेटे, उपायुक्त कैलास गावडे, शहर अभियंता संजय कटेकर, मुख्य लेखा अधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, सहाय्यक आयुक्त डॉ.वैभव विधाते यांच्यासह पालिकेतील सर्व विभागांचे विभाग प्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते.

उपायुक्त कल्पिता पिंपळे यांनी आपल्या पनवेल महापालिकेच्या कारकिर्दीमध्ये वाहन विभाग, भांडार विभाग आणि पंतप्रधान आवास योजनेचे काम उत्तम सांभाळले. पंतप्रधान आवास योजने अंतर्गत पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यातील प्रकल्प मार्गी लावण्यामध्ये त्यांचा मोलाचा वाटा होता. तसेच तिसऱ्या प्रकल्पास पर्यायी जागा मिळण्याच्या दृष्टीने हिरहिरीने प्रयत्न केला.

# ऑक्टोपसचा विळखा

भारतात ऑनलाइन गेमिंगवर कठोर नियंत्रण आणण्यात केंद्र सरकारने आधीच उशीर केला आहे. आता केंद्रीय माहिती तंत्रज्ञान खाते नवी स्वयंनियंत्रण व्यवस्था निर्माण करण्याचा विचार करीत आहे. मात्र, सध्याचा ऑनलाइन गेमिंगचा विस्तार आणि बहुपदरी धोका पाहता सरकारला आणखी अनेक खंबीर पावले टाकावी लागतील. २०१८ मध्ये दिल्लीत ऑनलाइन गेमिंगची टोळी पकडली, तेव्हा याचा व्याप किती असेल, याची कल्पना यंत्रणांना आली. दोन दिवसांपूर्वी प्रयागराज येथे एकाला अटक झाली. त्याच्या तपासावरून त्या ऑनलाइन गेमिंग सर्किटचे नियंते आखाती देशांमध्ये असल्याचे लक्षात आले. ऑनलाइन गेमिंगमध्ये लाखो लोकांकडून जमा होणारा अफाट पैसा असा देशाबाहेर तर जातो आहेच; पण त्याचे रूपांतर 'क्रिप्टो करन्सी'मध्येही होते. देशात अधिकृतपणेच ऑनलाइन गेमिंगची बाजारपेठ ४० हजार कोटींची आहे. मात्र, याच्या पलीकडे हे विश्व ऑक्टोपससारखे चहूदिशांना पसरले असून त्याच्या सोंडा अनेक देशांमध्ये आहेत. हा केवळ काळ्या पैशाचा, गुन्हेगारी अधोविश्वाचा, तरुणाईच्या मानसिक आरोग्याचा प्रश्न नाही; तर देशाच्या संरक्षण आणि सुरक्षिततेशीही हा विषय अनेक अंगांनी भिडलेला आहे. केंद्र सरकारने नव्या नियमांबाबत नागरिकांच्या सूचना मागवताना या विषयाची खोली आणि गांभीर्य मनाशी बाळगले असेल, अशी अपेक्षा आहे. केंद्र सरकारने माहिती व तंत्रज्ञान या झपाट्याने विस्तारणाऱ्या विषयाबाबत अलीकडेच नवा कायदा केला. मात्र, तो कायदा अनेक प्रकारे ऑनलाइन गेम्स व गेमिंगला सर्व प्रकारे जोडून घेण्याची गरज आहे. ऑनलाइन गेमिंग हा शब्द तंत्रज्ञानाचा वर्ख घेऊन आला असला तरी त्यात जुगार व जुगारी मनोवृत्तीच अनुस्यूत आहे. त्यामुळे, १८६७ मध्ये ब्रिटिशांनी केलेला सार्वजनिक जुगाराच्या विरोधातील कायदाही त्याला लागायला हवा. अर्थात, हा इतका जुना कायदा व्यापकपणे राबवणे, सध्या शक्य नाही. या ऑनलाइन गेमिंगच्या धोक्याची पहिली घंटा काही वर्षांपूर्वी तमिळनाडूत वाजली. तेथे अचानक आत्महत्यांची वार्षिक सरासरी वाढली. खोलात गेल्यावर हे प्रमाण वाढण्यात ऑनलाइन गेमिंगचे यशापयश आणि नुकसान यांचा संबंध लक्षात आला. तमिळनाडूत या खेळांच्या आहारी गेलेल्या अवघ्या ११ वर्षांच्या मुलाने आत्मघात केला, तेव्हा तिथले समाजमन खडबडून जागे झाले. राज्य पातळीवर वेगळा कायदा झाला. आज भारतात अनेक राज्यांनी असे कायदे केले आहेत. ते कायदे जुगारसदृश ऑनलाइन खेळांवर बंधने आणतात. मात्र, ते पुरेसे आहेत का, हा प्रश्नच आहे. काही दिवसांपूर्वी अंमलबजावणी संचालयानलयाने एका ऑनलाइन गेमिंग कंपनीची कुंडली मांडली. तेव्हा चार हजार कोटी रुपयांचा व्याप असणारी ही कंपनी थेट चीनशी संबंधित निघाली. तिची भारतीय नोंदणी आणि तिचे भारतीय संचालक ही सारीच बनावट यंत्रणा पोलिसांना ठकवण्यासाठी उभी करण्यात आली होती. आज देशभरात अशी किती रॅकेट्स चालू असतील, याची कल्पना करणे अवघड आहे. मुख्य म्हणजे, या जाळ्यात अल्पवयीन मुले मोठ्या प्रमाणात सापडतात आणि त्यांचे सर्वप्रकारे नुकसान होते. प्रसंगी ती हिंस्र होण्याचा, आयुष्यातून उठण्याचा, गुन्हेगारीकडे वळण्याचा धोका असतोच. ऑनलाइन गेमिंगमध्ये स्कील्स म्हणजे खेळणाऱ्याचे कसब आणि चान्स किंवा लक म्हणजे नशीब, असे दोन प्रकार असतात. मात्र, खेळणाऱ्याचे कसब हाही सापळाच असतो. याचे कारण, वाढत्या श्रेणीने कसब गाठण्यासाठी तासनतास सराव करावा लागतो. पुढचे टप्पे खुणावत राहतात आणि दरम्यानच्या काळात शारीर व मानसिक आरोग्याची वाट लागते. 'लक'च्या खेळात तर एकदा गुरफटत गेले की लक्षावधी रुपयेही गमावण्याचा धोका असतो. यंदा ऑगस्टमध्ये आयकर खात्याने एक आकडेवारी जाहीर केली. त्या तपशिलानुसार आधीच्या तीन वर्षांमध्ये भारतीयांनी ऑनलाइन गेमिंगमध्ये ५८ हजार कोटी रुपये कमावले. ही 'अधिकृत' आकडेवारी आहे. यावरून गमावलेल्या पैशाचा अंदाज बांधता येतो. काही काळापूर्वी आयटी क्षेत्रातल्या ३९ वर्षांच्या अभियंत्याने अचानक आत्महत्या केली. नंतर तपासात लक्षात आले की, ऑनलाइन पत्त्यांच्या जुगारात तो ७८ लाख रुपये गमावून बसला होता. ते पैसे कसे फेडायचे, याचे डोक्यावर व मनावर ओझे होते. अशावेळी ऑनलाइनच्या विश्वात अंडरवर्ल्डचाही प्रवेश होतो. हातात असणाऱ्या मोबाईलशी खेळताना किंवा आयपॅड, लॅपटॉपमध्ये फिरस्ती करताना ऑनलाइन गेमिंगचे असंख्य सापळे लावलेले असू शकतात. शिक्षण, कौशल्यसराव, अभ्यास, व्यावसायिक काम किंवा कलांचा आस्वाद आणि ऑनलाइन गेम्स, गेमिंग यांची विश्वे परस्परांना इतकी खेटून उभी असतात की क्षणार्धात इथून तिथे जाणे हे स्वाभाविक असते. 'क्रेझी ऑक्टोपस' हा ऑनलाइन खेळ अनेकजण खेळतात. मात्र, या शतपाद ऑक्टोपसचा विळखा कुणालाही आवळून कायमचा बरबाद करू शकतो. केंद्र सरकारने नवे नियम आणि कायदे करताना तरुण पिढीला यातून वाचविण्यावर सर्वाधिक भर द्यायला हवा.

## रोहा देवकान्हे येथे ८ जानेवारी रोजी बैलगाडीच्या जंगी शर्यतीचे आयोजन

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

रोहा तालुक्यातील मौजे देवकान्हे येथे देवकान्हे,बाहे,आणि धानकान्हे या गावांच्या संयुक्त विद्यमाने गावदेवी देवकान्हे माती बंदर येथे रविवारी ८ जानेवारी रोजी सकाळी ठीक ७ वाजता रायगड जिल्हा स्तरीय बैलगाडी ( छकडा ) जंगी शर्यतींचे आयोजन केले असून स्पर्धेत विजयी होणाऱ्या गाडी मालकाला योग्य पारितोषिक देऊन त्यांचा सन्मान करण्यात येणार आहे.

गावदेवी देवकान्हे माती बंदर च्या मैदानावर रविवारी ८ जानेवारी रोजी ठीक सकाळी ७ वाजता या बैलगाडी जंगी शर्यतींचे आयोजन येथील देवकान्हे,बाहे,आणि धानकान्हे या गावांतील बैलगाडी हौशी मंडळीने केला आहे त्यामुळे आयोजित केलेल्या या भव्य दिव्य स्पर्ध्येत जिल्ह्यातील असंख्ये बैलगाडी (छकडा ) स्पर्धकांनी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात येत आहे तरी इच्छुक स्पर्धकांनी आपली नावे ही ६ जानेवारी पर्यंत सिद्धेश शेडगे ७०६६८३०४७८, महेंद्र थिटे ९२०९६४७०४२, संदेश भोईर ८१८०८५४६२८, राकेश सुटे ७८७५४१०७९९, आकाश जाधव ७०३०१८१२०५, प्रशांत गायकवाड ७३५०६७७७३४, अशोक देवकर ८२६३९०८८७४, अंकेश सुटे ८०१०६०४५१२, वरील क्रमांकावर संपर्क साधून नावे नोंदणी करावी असे आवाहन आयोजक गावदेवी देवकान्हे यांच्या कडून करण्यात येत आहे. तसेच स्पर्ध्येच्या नियम व अटी पुढीलप्रमाणे पंचांचा निर्णय अंतिम राहील,ज्या गटात बैलगाडी ठेवण्यात आली आहे त्याच गटात ती गाडी सोडण्यात येईल तसेच जर गाडी कोणत्याही कारणास्तव सुटली तर ती गाडी पुढील गटात सोडण्यात येणार नाही ही स्पर्धकांनी नोंद घ्यावी,कोणताही प्रकारचा वाद निर्माण केल्यास ती गाडी बाद केली जाईल.तसेच शुल्लक कारणावरून वाद घालू नये.वाद घातल्यास पुढील तीन शर्यतीत बंदरात प्रवेश दिला जाणार नाही,प्रत्येक गट हा ५ मिनिटांनी सोडला जाईल कारण लाईनवर लावून गाड्या सोडण्यात येणार आहेत तसेच गाडी चालकांनी वरील नियमांचे पालन केले नाही तर ती गाडी स्पर्धेतून बाद केली जाईल गाडी स्पर्धकांची नावे ही ६ जानेवारी सायंकाळी ७ वाजेपर्यंत नोंदवली जाणार आहेत तद्नंतर नोंद नावे घेतली जाणार नाहीत,स्पर्धेतील गाडी ही बिना काठी व एक हालकणारा ड्रायव्हर असणार आहे यांची प्रथम येणाऱ्या सर्व स्पर्धकांनी नोंद घ्यावी. तरी या स्पर्धा यशस्वी होण्यासाठी गावदेवी देवकान्हे माती बंदर येथे देवकान्हे , बाहे , धानकान्हे येथील गाडी हाकळणारे हौशी ग्रामस्थ अधिक परिश्रम घेत आहेत.

## सुधागड: पडसरे पूल बनलाय धोकादायक ; संरक्षक कठडे तुटून सळ्या बाहेर

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यातील महागाव ग्रामपंचायत हद्दीतील पडसरे गावाकडे जाणारा ओढया वरील पूल अत्यंत जीर्ण व धोकादायक बनला आहे. त्यामुळे सदरचा पूल कोसळून मोठी दुर्घटना होण्याची दाट भीती निर्माण झालीय. विशेष म्हणजे वाहतुक, प्रवास व रहदारीसाठी एकमेव पूल आहे. पडसरे आदिवासी आश्रमशाळा या ठिकाणी असून साधारणत ५०० च्या आसपास विद्यार्थी येथील शिक्षण घेण्यासाठी दुर्गम भागातील आदिवासी वाड्यापाड्यातून विद्यार्थी शिक्षणासाठी येत असतात. मुलांच्या जेवणाची व्यवस्था या शाळेत होत असल्याने यासाठी लागणारे रेशन साहित्याची याच पुलावरून वाहतूक होत असते. त्यामुळे हा पूल अत्यंत महत्वाचा आहे. शिवाय या पुलावरून महागाव, कवेळे, हातोंड, चंदरगाव, ताडगाव, लोळगे वाडी, एकलघर, शिरसे वाडी, चरफळवाडी आदींसह गावे व कातकरवाडी येथील नागरिकांची , विद्यार्थ्यांची याच पुलावरून येजा सुरू असते. तसेच निसर्गाच्या कुशीत असलेला पडसरे धबधबा हा पर्यटकांसाठी आकर्षण ठरतोय. रायगड सह मुंबई पुणे व अन्य भागातील पर्यटक नागरिक याच पुलाच्या रस्त्यालगत असलेल्या धबधब्याच्या मनमुराद आनंद लुटण्यासाठी येत असतात. या पुलावर सतत वाहनांची वर्दळ सुरू असते.मात्र आजघडीला हा पूल शेवटची घटका मोजतोय. पुलाचे संरक्षण कठडे तुटले आहेत. सळ्या बाहेर निघाल्या आहेत. पुलाची खालील बाजू व खांब मोडकळीस आलेत, ते केव्हाही तुटू शकतात, व पूल कोसळू शकतो, अशी चिंताजनक परिस्थिती आहे. एकावेळी अरुंद असलेल्या पुलावरून दोन वाहने पूल ओलांडताना सळ्यानी अपघात होण्याची तसेच वाहन पुलाखाली कोसळण्याची दाट शक्यता आहे. एखादी जीवघेणी दुर्घटना घडण्यापूर्वी पडसरे पुलाचे नव्याने मजबूत व दर्जेदार बांधकाम करण्यात यावे, व नागरिक, पर्यटक व विद्यार्थी , रुग्णांचा प्रवास सुखकर व्हावा अशी मागणी केली जात आहे.

## पोलादपूर तालुक्यातील १६ उपसरपंच निवडीने ग्रामपंचायतींच्या निवडणुकीची प्रक्रिया पुर्णत्वास

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील १६ ग्रामपंचायतींच्या निवडणुकांची मतमोजणी २० डिसेंबर २०२२ रोजी झाल्यानंतर २ जानेवारी २०२३ रोजी या सर्व सोळा ग्रामपंचायतींच्या उपसरपंचपदासाठी बिनविरोध निवडणूक होऊन तालुक्यात दुसऱ्या टप्प्यातील निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

पोलादपूर तालुक्यातील १६ ग्रामपंचायतींच्या निवडणुकांवेळी उमरठ ग्रामपंचायतीचे सरपंचपद रिक्त राहिले तर बोरघर ग्रामपंचायतीमध्ये सरपंचपदी बंडू विठू पारधी, लोहारे सरपंचपदी दीपक पवार, धामणदिवी येथे सरपंचपदी क्षमता बांद्रे, चांभारगणी बुद्रुकमध्ये सरपंचपदी तानाजी पवार, कालवली ग्रामपंचायतीमध्ये सरपंचपदी किरण पवार, दिविल ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी सागर देवे, भोगाव खुर्द मध्ये सरपंचपदी प्रियंका कदम, गोळेगणी सरपंचपदी प्रकाश दळवी, कोतवाल बुद्रुकमध्ये सरपंचपदी रेखा दळवी, कोतवाल खुर्द सरपंचपदी अविनाश शिंदे, कापडे खुर्द सरपंचपदी संदीप काळे, ओंबळी ग्रा.पं.सरपंचपदी रूपाली चिकणे, परसुले सरपंचपदी रमेश शिंदे, पैठणमध्ये सरपंचपदी शीतल येरूणकर सरपंच आणि पार्ले येथे सरपंचपदी आशा पवार यांची निवड झाल्याचे स्पष्ट झाले आहे. सोमवार, दि. २ जानेवारी २०२३ रोजी उपसरपंचपदासाठी झालेल्या निवडप्रक्रियेमध्ये सर्व १६ ग्रामपंचायतींमध्ये बिनविरोध उपसरपंच निवडण्यात आले. यामध्ये उमरठचे सरपंचपद रिक्त असताना इंद्रजित कळंबे यांची उपसरपंचपदी निवड झाली तर धामणदिवी येथे नथुराम जाधव, ओंबळी येथे सखाराम चिकणे, पैठण येथे अरूण दरेकर, बोरघरमध्ये नारायण उतेकर, गोळेगणी येथे ज्ञानेश्वर मोरे, कोतवाल खुर्द बबन शिंदे, प्रमोद मोरे, पार्लेमध्ये भिमराज शिंदे, गणेश तळेकर, विलास जाधव, लोहारे येथे संदेश नरे, राजेश कदम, कालवलीमध्ये सविता भोसले, कुंदा चिकणे तर कापडे खुर्दमध्ये सोपान निकम आदींची उपसरपंचपदी बिनविरोध निवड झाल्याची माहिती पोलादपूर पंचायत समितीचे विस्तारअधिकारी हंबीर यांनी दिली.

## शिक्षणतज्ज्ञ सावित्रीबाई फुले जयंती साजरी

**दै.रायगड नगरी । कर्जत**

भाजप प्रदेशाध्यक्षा चित्रा वाघ यांच्या आदेशानुसार,व रायगड जिल्हा अध्यक्षा अश्विनी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, अतिशय कर्तृत्ववान, समाज सुधारक आणि शिक्षणतज्ज्ञ सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त कर्जत शहर महिला मोर्चा तर्फे महिला मंडळाच्या विद्या विकास मंदिर या शाळेत आयोजन करण्यात आले.

नगरसेविका स्वामीनी मांजरे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची माहिती सांगितली.कार्यक्रमासाठी कर्जत शहर महिला मोर्चा अध्यक्षा सरस्वती चौधरी, जिल्हा चिटणीस बीनिता घुमरे, प्रदेश युवा मोर्चा सुषमा ढाकणे, कोकण संपर्क प्रमुख गायित्री परांजपे, तालुका अध्यक्षा स्नेहा गोगटे, सरचिटणीस गीतांजली देशमुख आदी सह शाळेतील मुख्याध्यापिका स्नेहा गाडे ,दर्शना बडेकर, श्रद्धा मुंढेकर आणि त्याचे सहकारी शिक्षिका उपस्थित होते.


### हरविल्या आहेत



नाव – लता　वय – ७० वर्षे
रंग – गोरा　उंची – ५.६ फुट
संपर्क - 7738270140


## कोलाड परिसरातील बत्ती गूल, ४० ते ४५ गावे अंधारात

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

रोहा तालुक्यातील कोलाड खांब परिसरातील ४० ते ४५ गावातील मंगळवार दि ३ जानेवारी २०२३ रोजी मध्यरात्री पासून बत्ती गूळ झाली असून येथील नागरिकांना संपूर्ण रात्र अंधारात काढावी लागल्यामुळे नागरिकांकडून तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे.

या परिसरातील जनतेला वाटले कि अदानी इलेक्ट्रिकल कंपनीस वितरणाचा परवाना देऊ नये विज कंपनीचे खाजगीकरणाचे धोरण रद्द करावे कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्या कामगारांना कायम करावे. तिन्ही कंपन्यातील ४२००० रिक्त भरण्यासाठी प्रक्रिया तात्काळ सुरु करावी यासाठी महावितरण ७२ तास शटडाऊन केला आहे असे वाटले परंतु इतर परिसरातील विज पूर्णपणे सुरु असल्याचे नागरिकांच्या लक्ष्यात आल्यावर या परिसरातील जनता आक्रमक झाली.

याविषयी कोलाड महावितरण कार्यालयात राजकीय,सामाजिक व विविध क्षेत्रातील जेनतेने उपस्थित राहून चौकशी केली असता कांदळ गावावरून येणारी लाईन काही तांत्रिक बिघाडामुळे खराब झाल्यामुळे या परिसरातील विज बंद झाल्याचे महावितरण कंपनीकडून सांगण्यात आले.त्यामुळे आम्हांला अडचणीत जनतेने सहकार्य करावे.विज दुरुस्तीचे काम सुरु असून ते लवकरच पुर्ण केले जाईल व विज सुरु करण्यात येईल असे सांगण्यात आले.

# व्हॅनचालक, विद्यार्थी आणि शाळेची माहिती मिळणार आता एका क्लिकवर

### पनवेल विद्यार्थी वाहक संस्थेच्या वतीने स्वतंत्र सॉफ्टवेअर विकसित

**दै.रायगड नगरी । पनवेल**

विद्यार्थी सुरक्षितताय विद्यार्थी हिताय हे ब्रीदवाक्य घेऊन पनवेल विद्यार्थी वाहक संस्था काम करत आहेत. संस्थेचे सभासद असणारे स्कूल व्हॅन, चालक, विद्यार्थी व शाळेची माहिती एका क्लिकवर उपलब्ध व्हावी यासाठी संस्थेच्या वतीने स्वतंत्र सॉफ्टवेअर विकसित करण्यात येत आहे. यासाठी वेब प तयार करण्यात आला आहे. माहिती संकलित करून सर्व डाटा हायटेक पद्धतीने उपलब्ध करण्याचा हा वस्तूपाठ संस्थेने इतरांसमोर ठेवला आहे.

पनवेल परिसरात मोठ्या प्रमाणात खाजगी शिक्षण संस्था आहेत. या ठिकाणी हजारो विद्यार्थी शिक्षण घेतात. सुरक्षित विद्यार्थी वाहतूक, थेट घरापर्यंत सेवा, तुलनेत कमी शुल्क यामुळे स्कूल व्हॅन ला विशेष प्राधान्य दिले जाते. यामधून शाळेत ये जा करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ही सर्वात जास्त आहे. पनवेल मधील बहुतांशी स्कूल व्हॅन चालक पनवेल विद्यार्थी वाहक संस्थेच्या अखत्यारीत संघटित झाले आहेत. या संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची सुरक्षितता अत्यंत महत्त्वाची मानली जाते. गणवेशा बरोबरच वाहतुकीच्या नियमांचे पालन करणे, व्यसनमुक्तता, सर्व कागदपत्रांची पूर्तता त्याचबरोबर शिस्त या अनेक गोष्टींचे पालन करणाऱ्यांना संस्थेचे सभासदत्व दिले जाते. गेल्या अनेक वर्षांपासून या क्षेत्रात काम करणारे पांडुरंग हुमणे पनवेल विद्यार्थी वाहक संस्थेचे नेतृत्व करीत आहेत. स्कूल व्हॅन चालकांचे हित आणि विद्यार्थ्यांची सुरक्षितता हा प्रमुख हेतू आणि उद्देश घेऊन हुमणे आणि त्यांचे संस्था कार्यरत आहे.

आजच्या घडीला या संस्थेच्या अखत्यारीत अडीचशे पेक्षा जास्त स्कूल व्हॅन आणि बसेस विदयार्थी वाहतुक करीत आहेत. हजारो विद्यार्थ्यांची ने आण या व्हॅनमधुन केली जाते. संस्थेकडे सर्व गाड्यांचे कागदपत्र, फिटनेस सर्टिफिकेट, परवाने त्याचबरोबर वाहन चालकाचा बायोडाटा विद्यार्थ्याचे नाव, त्याचा रूट त्याचबरोबर शाळा याची माहिती असते.

हे सर्व जमा करताना मोठी कसरत करावी लागते. दरवर्षी हा डाटा संकलित करताना अनेक अडचणी येतात. त्याचबरोबर अशाप्रकारे वैयक्तिक माहिती तपासणी किंवा शोधण्यासाठी वेळ लागतो.

हा सर्व डाटा एकाच क्लिकवर मिळावा त्याच्यामध्ये सूत्रता असावी या उद्देशाने पनवेल विद्यार्थी वाहक संस्थेने स्वतंत्र सॉफ्टवेअर विकसित करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार प्रत्यक्ष कामालाही सुरुवात झाली आहे. वेब अप्लिकेशनच्या माध्यमातून संस्थेचा कारभार अत्याधुनिक होणार आहे.

> हे माहिती आणि तंत्रज्ञानाचे युग आहे. त्यानुसार आम्हालाही बदलणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर आमच्या संस्थेचे स्वतंत्र सॉफ्टवेअर असणार आहे. त्यासाठी खास वेब प तयार करण्यात येत आहे. यामध्ये प्रत्येक विद्यार्थी, स्कूल व बस चालक शाळांची, इत्यंभूत माहिती गोळा केली जाईल. आम्हाला आरटीओ, वाहतूक वाहतूक विभाग, शाळा मुलांची माहिती मागत होते ही संस्था या अगोदरही त्यांना ती देत आलेली आहे. एका फॉर्मवर प्रत्येक वर्षी मुलांची माहिती संकलित करावी लागत होती. त्यानुसार संस्था वेब प विकसित करत आहे. एका क्लिकवर यापुढे सर्व माहिती उपलब्ध होईल.
>
> **– पांडुरंग हुमणे (संस्थापक अध्यक्ष, पनवेल विद्यार्थी वाहक संस्था)**


**Government of Maharashtra**
**Range Forest Office Phansad Wildlife Sanctuary**
At.New Mazgaon (Kasgaon), Post-Mazgaon, Tal-Murud-Janjira, Dist-Raigad
Email : rfophansad@gmail.com

**Tender Notice No.02/2022-23**

**Range Forest Officer-Phansad (Wildlife) Sanctuary invites proposals from interested Civil Contractors to participate in the competitive bidding process of B-1 Tendering to-**

| Sr.No. | Work Description | Work Cost |
|---|---|---|
| 1 | Providing and erecting Cement Concrete boundary pillars (Class-I=10 Nos. + Class-II=20 Nos) on the boundary of Comptt. No.683, 684 of Usaroli village in Phansad (WLS) of Thane Wildlife Division, Thane. | 160765/- |
| 2 | Providing and erecting Cement Concrete boundary pillars (Class-I=07 Nos. + Class-II=18 Nos) on the boundary of Comptt. No.679, 680 of Vandre village in Phansad (WLS) of Thane Wildlife Division, Thane. | 131766/- |
| 3 | Providing and erecting Cement Concrete boundary pillars (Class-I=07 Nos. + Class-II=25 Nos) on the boundary of Comptt. No.674, 675, 677 of Vihoor village in Phansad (WLS) of Thane Wildlife Division, Thane. | 158262/- |
| 4 | Providing and erecting Cement Concrete boundary pillars (Class-I=03 Nos. + Class-II=09 Nos) on the boundary of Comptt. No.678 of Velaste village in Phansad (WLS) of Thane Wildlife Division, Thane. | 54907/- |
| 5 | Providing and erecting Cement Concrete boundary pillars (Class-I=10 Nos. + Class-II=30 Nos) on the boundary of Comptt. No.686, 687, 688 of Danda village in Phansad (WLS) of Thane Wildlife Division, Thane. | 209783/- |
| 6 | Providing and erecting Cement Concrete boundary pillars (Class-I=05 Nos. + Class-II=10 Nos) on the boundary of Comptt. No.689, 690 of Sarva village in Phansad (WLS) of Thane Wildlife Division, Thane. | 82214/- |
| 7 | Providing and erecting Cement Concrete boundary pillars (Class-I=09 Nos. + Class-II=37 Nos) on the boundary of Comptt. No.692, 701 of Supegaon village in Phansad (WLS) of Thane Wildlife Division, Thane. | 227613/- |
| 8 | Providing and erecting Cement Concrete boundary pillars (Class-I=15 Nos. + Class-II=40 Nos) on the boundary of Comptt. No.691, 696, 697 of Kashid village in Phansad (WLS) of Thane Wildlife Division, Thane. | 286449/- |
| 9 | Providing and erecting Cement Concrete boundary pillars (Class-I=26 Nos. + Class-II=38 Nos) on the boundary of Comptt. No.270, 272, 273 of Shiloshi village in Phansad (WLS) of Thane Wildlife Division, Thane. | 361050/- |

B-1 Tender Sumission would be offline & the deadline to submit the proposals is 12/01/2023 at 5.00 PM. only.

(Blank B-1 Tenders forms are available at Range Forest office Phansad for Rs.250/- each (18% GST Extra) From 10.00 AM On 05/01/2023 to 12/01/2023 up to 3:00 PM.)

**Sd/-**
**Range Forest Officer**
**Phansad (Wildlife) Sanctuary**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# घर देतो म्हणून ७० ग्राहकांचे पैसे हडप; रामदास शेवाळे यांच्याकडे अनेकांची धाव

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील डेरवली येथे गृहनिर्माण संकुल उभा करून त्या ठिकाणी स्वस्तात घरे देण्याचे अमिष दाखवून एका बांधकाम व्यवसायकाने कळंबोलीतील ७० जणांना फसवले आहे. हवालदिल झालेल्या या ग्राहकांनी बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे जिल्हा संपर्कप्रमुख रामदास शेवाळे यांना साकडे घातले. त्यांनी या सर्वांचे म्हणणे ऐकून घेत या विरोधात लढा पुकारण्याची ग्वाही दिली.

पनवेल तालुक्यामध्ये अनेक ठिकाणी स्वस्तात घरे देतो म्हणून हजारो ग्राहकांची फसवणूक झाल्याच्या घटना या अगोदर घडलेल्या आहेत. त्यामुळे येथील रिअल इस्टेट एक प्रकारे बदनाम झाले आहे. हनुमंत चव्हाण नावाच्या एका बांधकाम व्यावसायिकाने डेरवली येथे एक गृह संकुल उभारत असल्याचे अनेक ग्राहकांना भासवले. येथे स्वस्तात सदनिका उपलब्ध करून देण्याचे प्रलोभने त्याने दाखवले. आपल्या स्वप्नातील घर होईल तसेच गुंतवणूक या उद्देशाने कळंबोलीतील ७० जणांनी चव्हाण कडे बुकिंग केली.

त्यासाठी टप्प्याटप्प्याने त्याला पैसेही देण्यात आले. मात्र आज तागायत त्याने संबंधितांना घर दिले नाही . ना त्यांचे पैसे परत केले. यापैकी काहींनी आपल्या आयुष्याची सर्व पुंजी या घराकरता लावली. काहींनी कर्ज काढून या बिल्डरला पैसे दिले. त्यामुळे हे सर्वजण आर्थिक दृष्ट्या अडचणीत सापडले आहेत. पैसे परत मागण्यासाठी गेलेल्यांना चव्हाण यांनी धमकावल्याच्या तक्रारी सुद्धा संबंधित ग्राहकांनी केल्या आहेत. वारंवार पाठपुरावा करूनही त्यांना न्याय मिळाला नाही. दरम्यान यापैकी काही ग्राहकांनी बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे जिल्हा संपर्कप्रमुख रामदास शेवाळे यांची भेट घेतली. त्यांनी त्यांच्याकडे आपली ही व्यथा मांडली.

संबंधित बांधकाम व्यवसायीकडून झालेली फसवणूक झाल्याबद्दल तक्रार सुद्धा केली. या सर्वांना धीर देत त्यांना शेवाळे यांनी मार्गदर्शन केले. इतकेच नाही तर या सर्वसामान्य गोरगरीब फसवणूक झालेल्या कळंबोलीकरांच्या न्याय हक्कासाठी थेट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन हा प्रश्न मार्गी लावू अशी ग्वाही त्यांनी दिली.

पनवेल येथील डेरीवली येथे स्वस्तात फ्लॅट बनवून देतो असे सांगून हनुमंत चव्हान नामक बिल्डर ने कळंबोली मधील ७० लोकांचे व अजून बाहेरील इतर लोकांचे लाखो रुपये घेऊन काही वर्षांपूर्वी लंपास झाला आहे आणि पैसे परत मागितले तर लोकांना धमकावले जात आहे . ही व्यथा घेऊन कळंबोली मधील ७० नागरिक माझ्याकडे आले असता त्यांचे सर्व पुरावे पाहून त्यांना मार्गदर्शन केले व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा कानावर ही गोष्ट घालून लवकरात लवकर न्याय मिळावा या यासाठी प्रयत्न करू

**– रामदास शेवाळे (जिल्हा संपर्कप्रमुख, बाळासाहेबांची शिवसेना)**

# संक्षिप्त...

## मोटारसायकलची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील फडके नाट्यगृहच्या पाठीमागील रोडवर पार्क केलेली मोटारसायकल अज्ञात इसमाने चोरून नेल्याची या बाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात नोंदवण्यात आली आहे.

योगेश पांडुरंग जाधव यांनी त्यांच्या मालकीची काळ्या निळ्या रंगाची हिरो कंपनीची पॅशन प्रो मोटार सायकल क्र चक ४६ –ढ ३१८६ ही आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह च्या पाठीमागे रोडवर फडके रोड येथे पार्क केली होती. मात्र अज्ञात चोरट्याने हि मोटारसायकल चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.

## अल्पवयीन मुलगी बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तालुक्यातील पडघेगाव येथील राहते घरातून अल्पवयीन मुलगी बेपत्ता झाल्याने ती हरवल्याची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात नोंदवण्यात आली आहे.

सदर मुलीचे नाव राधिका वर्मा असून तिचे वय १६ वर्षे आहे. या मुलीचा रंग सावळा, चेहरा गोल, उंची ५ फुट, नाक–सरळ, केस–काळे, नाकात डाव्या बाजूस चमकी, तसेच अंगात लाईट हिरव्या रंगाचा सलवार व लाईट हिरव्या रंगाची लेगीन्स घातली असून पायात चप्पल घातलेली आहे.

सदर मुलीला हिंदी, भोजपुरी, मराठी अवगत असून या मुलीबाबत कोणाला काही माहिती असल्यास तळोजा पोलीस ठाणे किंवा पोउपनि बळीराम घंटे यांच्याशी संपर्क साधावा.


## वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


# दुबार शेतीसाठी शेतकऱ्यांना बियाणे मिळेना

**दै.रायगड नगरी । कर्जत**

दुबार शेतीसाठी शेतकऱ्यांना बियाणे मिळेना कृषी कार्यालय,कृषी उत्पन्न बाजार समिती, खरेदी विक्री संघ, प्रादेशिक कृषी संशोधन केंद्र सगळ्यांकडूनच नकार घंटा शेतकरी हतबल झाले आहेत.

कर्जत तालुक्यात दरवर्षी डिसेंबर महिन्यात राजनाला कालव्याला दुबार भातशेतीसाठी पाणी सोडण्यात येते. यंदाही पाणी सोडण्यात आले आहे, मात्र भातशेती लावण्यासाठी जे चांगले बियाणे आवश्यक असते ते बियाणेच कृषी कार्यालय,कृषी उत्पन्न बाजार समिती, खरेदी विक्री संघ, प्रादेशिक कृषी संशोधन केंद्र यांच्याकडे उपलब्ध नसल्याने आता भातशेती करायची तरी कशी असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे.

कर्जत तालुक्यात मोठ्या प्रमाणात भातशेती केली जाते. पावसाळ्यात पावसाच्या पाण्यावर खरीप पीक तथा भातशेती केली जाते. तेव्हा कृषी कार्यालय, कृषी उत्पन्न बाजार समिती,भात खरेदी विक्री संघाकडून शेतकऱ्यांना चांगल्या दर्जाचे बियाणे उपलब्ध करून दिले जाते. जुलै ते नोव्हेंबर या महिन्यात भात तयार होते. त्यांनतर पुन्हा याच शेतीत राजनाला कालव्याच्या पाण्यावर दुबार भातशेती करण्यात येते. मात्र त्यासाठी जे बियाणे लागते ते आता उपलब्ध होत नसल्याने शेतकऱ्यांसमोर संकट उभे राहिले आहे.

कर्जत ३, ५, ७ ,१८४ तसेच सह्याद्री ३ हि बियाणे चांगल्या दर्जाची असून कमी दिवसात अधिक उत्पन्न देणारी हि बियाणे आहेत. मात्र आता ती कोठेही उपलब्ध नाहीत. याबाबत तालुका कृषी अधिकारी शीतल शेवाळे यांच्याकडे विचारणा केली बियाणे शिल्लक नाही. शेतकऱ्यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती,भात खरेदी विक्री संघ यांच्याशी संपर्क करावा असे शेतकऱ्यांना सांगितले.

शेतकऱ्यांनी त्यानुसार सुचविलेल्या ठिकाणी बियाणांबाबत विचारणा केली तेथूनही बियाणे नसल्याचे सांगण्यात आले. यामुळे शेतकरी हताश झाले आहेत. आता त्वरित बियाणे मिळाल्यास भात लागवड केली तर एप्रिल पर्यत भात तयार होईल अशी माहिती शेतकरी तथा राष्ट्रवादीचे जिल्हा सरचिटणीस तानाजी चव्हाण यांनी दिली.

उशिरा बियाणे उपलब्ध झाल्यास भातशेती तयार व्हायला जून महिना उजाडल्यास येणाऱ्या पावसामुळे तयार भात शेतीचे नुकसान होऊ शकते. त्यामुळे आताच बियाणे मिळणे गरजेचे आहे.

## म्हसळा पोलिस ठाण्यात वेगवेगळे दोन गुन्हे

# चोरी प्रकरणी आरोपी अटकेत ; मटका बुकिवर गुन्हा नोंद

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा पोलिस ठाण्यात वेगवेगळ्या दोन गुन्हाचे नोंदिने नुतन वर्षाचे स्वागत झाले आहे. पोलीसांनी घरफोडी चोरी प्रकरणी आरोपीला २४ तासाचे आत अटक केली आहे तर मटका बुकिवर गुन्हा नोंद करण्यात आला असल्याचे पोलिस निरीक्षक संदीपान सोनवणे यांनी माहिती देताना सांगीतले.

म्हसळा तालुक्यातील वरवठणे गावातील बंद घरातून मोबाईल आणि रोख रक्कम लांबविल्याची तक्रार महेफुज किफायत तालीब वय १८ रा.वरवठणे यांनी दिलेल्या फिर्यादी वरून म्हसळा पोलीसानी गुन्हा रजी.नं.१/२०२३ भा.द.वि. कलम ३८०, ४५४, ४५७ प्रमाणे गुन्ह्याची नोंद करण्यात आली. सदर चोरी दिं.२८ डिसें.२२ रात्री १० ते दि २९ डिसें २२ या कालावधीत चोरीची घटना घडली असता गुन्ह्याची नोंद सोम.दि. २ जाने २०२३ रोजी करण्यात आली. बंद घर उघडून चोरट्याने विवो वाय २१ मोबाईल आणि १७०० रुपये रोख लंपास केले होते. फिर्यादीने इथ्थंबूत माहिती दिली असता म्हसळा पोलीसानी योग्य तपास करुन दानिश समद शिरशिकर या चोरट्याला २४ तासाच्या आत जेरबंद करण्यात आले.चोरीचा तपास स.पोलिस निरीक्षक संदीपान सोनावणे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.हे.कॉ.संतोष चव्हाण करीत आहेत.

दुसऱ्या एका घटनेत १४८/२०२२ महाराष्ट्र जुगार अधिनियम १८८७ चे कलम ११ प्रमाणे आरोपी सचिन शरद खोत याला विनारवाना गैर कायदा मेन नावाचा मटका जुगार खेळत असताना रंगे हाथ पकडुन त्याचे वर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार ८४७ चव्हाण हे करत आहेत. या घटनेत मटका बुकी खोत याचे कडून मेन मटकाचे कार्बन कोपिसह दुय्यम पावती बुक व रोख रक्कम ६२५ रुपये जप्त करण्यात आल्याची करवाई पोलिस शिपाई इंगळे यांनी केली आहे.

# कळंबोलीमध्ये सावित्रीमाई पुस्तक दिंडी

## संत सावतामाळी समाज विकास मंडळाच्या वतीने सावित्रीबाई फुले जयंती उत्सव साजरा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्ताने कळंबोली येथे पुस्तकांची सावित्री दिंडी आयोजित करण्यात आले होते. यामध्ये महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून सावित्रीबाईंच्या नावाने जय जयकार करण्यात आला. त्याचबरोबर पर्यावरणाबरोबरच विविध सामाजिक विषयांवर संदेश देण्यात आला. लेक वाचवा लेक शिकवाचे आवाहन या निमित्ताने करण्यात आले.

महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले हे समाज सुधारक होते. सावित्रीबाई या पहिल्या महिला शिक्षिका म्हणून ओळखल्या जातात. पुणे येथील भिडे वाड्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरू करण्यात आली. तेथे त्यांनी मुलींना शिक्षण दिले. त्यांच्यामुळेच स्त्री शिक्षणाला चालना मिळाली.३ जानेवारी रोजी त्यांची जयंती दरवर्षी साजरी केली जाते. हा दिवस राष्ट्रीय बालिका दिन म्हणूनही साजरा केला जातो. कळंबोली येथे संत सावतामाळी समाज विकास मंडळाच्या माध्यमातून वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. फुले दांपत्यांचा समाज सुधारणाचा वसा त्याचबरोबर सत्यशोधक चळवळ पुढे घेऊन जाण्याचे काम मंडळाच्या वतीने केले जात आहे. मंगळवारी कळंबोली येथे सावित्रीबाई फुले जयंती उत्सव साजरा करण्यात आला. या



निमित्ताने वसाहतीमध्ये सावित्रीमाई फुले पुस्तक दिंडी काढण्यात आली. यामध्ये महिलांनी पिवळे फेटे परिधान करून सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा गौरव केला. यावेळी ढोल ताशा लेझीम पथकाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्याचबरोबर वारकरी संप्रदायाच्या बाल वारकऱ्यांनीही सहभाग नोंदवून कांदा मुळा भाजी अवघी विठाई माझी असे म्हणत संत सावता माळी यांच्या विचारांचा प्रसार केला. या निमित्ताने सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेची मिरवणूक काढण्यात आली या दिंडीवर कळंबोलीकरांनी पुष्पवृष्टी केली. सुधागड हायस्कूलच्या प्रांगणामध्ये आयोजित कार्यक्रमात विविध क्षेत्रात नावलौकिक प्राप्त केलेल्या समाज बांधवांचा सन्मान करण्यात आला. याशिवाय हळदीकुंकू समारंभ, अंधश्रद्धा निर्मूलना बाबत मार्गदर्शन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी आपली मनोगते व्यक्त केले.

या ठिकाणी सावित्रीबाई फुले आणि महात्मा ज्योतिराव फुले सेल्फी पॉइंट तयार करण्यात आला होता. सेल्फी काढण्यासाठी येथे मोठ्या प्रमाणात गर्दी करण्यात आली होती. त्याचबरोबर क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची माहिती देणारे फलक प्रदर्शन सुद्धा भरवण्यात आले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष नितीन शंकर जाधव, उपाध्यक्ष लहू शेठ मलकमिर, सचिव ॲड श्रीनिवास क्षीरसागर, कार्याध्यक्ष उद्धव भुजबळ, संपर्कप्रमुख सतीश ढोक, उत्तम शिंदे, सुनील रासकर, सचिन बोराटे, संदीप बोडके, लालासो शेवते, ईश्वर जाधव, जयराम डोके, महेंद्र जाधव, नवनाथ घनवट, बाळासाहेब ढोक, दीपक ढोपे यांनी विशेष परिश्रम घेतले.

या कार्यक्रमांमध्ये सावता माळी समाज विकास मंडळाच्या सभागृहासाठी बाळासाहेबांच्या शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख रामदास शेवाळे यांनी पाच लाख रुपयांची देणगी जाहीर केली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष सतिश पाटील यांनीही या कामासाठी एक लाख रुपये मदत देणार असल्याचे सांगितले.

# 300 लिटर डिजेलची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील मार्केट यार्ड येथिल कल्पतरू सोसायटी समोर उभ्या असलेल्या ट्रकची टाकीचे लॉक तोडुन अज्ञात इसमाने ३०० लिटर डिझेलची चोरी केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सुरेश गायकवाड याने त्याच्या ताब्यातील ट्रक क्र केएल ०८ बीक्यु.४०३० हा मार्केट यार्ड येथिल कल्पतरू सोसायटी समोर पार्क करून ठेवला होता.

अज्ञात इसमाने या ट्रकमधील डिजेल टाकीचे लॉक तोडुन त्यामध्ये अस–लेले २६४००/– रु. किमतीचे ३०० लिटर डिजेल चोरून नेले. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# विज कर्मचाऱ्यांच्या संपामुळे उरणच्या विज निर्मितीचा ५० मेगावट संच बंद

**दै.रायगड नगरी । उरण**

राज्यातील वीज कर्मचारी संपावर गेल्याने उरणच्या वायु विद्युत केंद्रातील महाजनकोच्या वीज निर्मिती वरही परिणाम झाला आहे. त्यामुळे उरण मधील वायु विद्युत केंद्रातील ५० मेगाव्याटचा सयंत्र बंद झाला आहे. परिणामी वायु विद्युत केंद्रातील २१० मेगाव्याट वीज निर्मिती १६० वर आली आहे. उरणच्या वायु विद्युत केंद्रात २६७ कामगार कार्यरत आहेत.

या संपात ३० कामगार संघटना सहभागी झाले आहेत. यामध्ये महाराष्ट्र विद्युत कर्मचारी व अभियंता संघर्ष समिती करण्यात आली आहे. या संपात सर्व संघटनाचे कामगार सहभागी झाले असल्याचा दावा संघर्ष समितीचे ए. पी. शिंदे,श्यामकांत पाटील,दत्ता सुळे,दुर्गादास नायक सय्यद हे या संपाचे नेतृत्व करीत आहेत.

वायु विद्युत केंद्रातील शंभर टक्के कामगार,अभियंते संपात सहभागी असून संपामुळे केंद्राच्या वायु विद्युत केंद्राच्या वीज निर्मितीवर परिणाम झाला आहे. त्यामुळे ५० मेगाव्याट संच बंद झाला आहे.

तर वीज निर्मिती सुरळीत ठेवण्यासाठी टाटा पॉवरचे तंत्रज्ञ बोलाविण्यात आले असल्याची माहिती वायु विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता सुनिल इंगळे यांनी दिली आहे.








जिल्हा माहिती कार्यालय, रायगड ने गेल्या वर्षभरात १ हजार १०१ बातम्या प्रकाशित केल्याबद्दल रायगड प्रेस क्लबचे अध्यक्ष भारत रांजणकर, अलिबाग प्रेस असोसिएशनचे प्रकाश सोनवडेकर, राजन वेलकर, हर्षद कशाळकर आणि यांनी जिल्हा माहिती अधिकारी मनोज शिवाजी सानप यांना गुलाब पुष्प देऊन त्यांचे व जिल्हा माहिती कार्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा प्रशासनाचे अभिवादन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

स्त्री शिक्षणाच्या जनक क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १३२ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून उपजिल्हाधिकारी (निवडणूक) श्रीमती स्नेहा उबाळे यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन केले.

यावेळी उपजिल्हाधिकारी (सा. प्र.) सर्जेराव मस्के–पाटील, तहसिलदार (सर्वसाधारण) विशाल दौंडकर तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील इतर अधिकारी–कर्मचारी उपस्थित होते.